साहित्याची भाषा

प्रा. डॉ. विजय रैवतकर
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी

व्यवहारभाषा, शास्त्रीय साहित्याची भाषा आणि ललित साहित्याची भाषा

व्यवहारभाषा शास्त्रीय भाषा आणि ललित साहित्याची भाषा या संदर्भात अभ्यासकांनी आपली भूमिका विशद केली आहे. त्यांच्या मतांचा परामर्श घेऊया.

वेलेक आणि वॉरेन यांच्या मते, **शास्त्रीय साहित्याची भाषा** ही शुद्ध अभिधात्मक असते. निर्दिष्ट वस्तू आणि तद्दर्शक चिन्ह यात एकास एक संबंध राखला जावा हा तिचा हेतू असतो. **साहित्याची भाषा** ही व्यंजनप्रचुर असते. अभिव्यंजकता हा तिचा खास असा अंगभूत पैलू आहे. **व्यवहार भाषा** ही एकरूप संकल्पना नव्हे. त्यात बोलीभाषा, व्यापारीभाषा, सरकारी भाषा, धार्मिकभाषा यांचा समावेश असतो.

वा. ल. कुलकर्णी यांच्या मते, **ललितसाहित्याच्या भाषेचे** उद्दिष्ट अनुभव साक्षात करणे हे आहे. **शास्त्रीय भाषा** तत्त्वांची भाषा आहे. **व्यवहार भाषा** ही साधनात्मक असून ती जीवनव्यवहारापयोगी असते. सार्वजनिकता हा व्यवहारभाषेचा महत्त्वाचा गुण असून तिचे स्वरूप निवेदनात्मक, स्पष्टीकरणात्मक, विवेचनात्मक आणि निर्देशात्मक असते.

शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या मते, **शास्त्रीय भाषा** ही प्रतिकात्मक असते. शास्त्रीय भाषेत अर्थ सुनिश्चित व काटेकोर असतात. शास्त्रीय भाषा ही वस्तूनिष्ठ ज्ञानाची भाषा आहे. **व्यवहार भाषेत** सुरावलीच्या अर्थव्यंजकतेला अधिक महत्त्व आहे. वाक्यार्थ केवळ शब्दार्थांनी न ठरता तो सुरावलीने ठरत असतो. व्यवहारभाषेत उच्चारानुसार परस्परविरोधी असे अर्थ निर्माण होत असतात. **ललित साहित्याची भाषा** ही सुरावली आणि शब्दार्थ यांच्याद्वारे प्रतिभानुभव निर्माण करणारी भाषा असते. प्रतिभानुभव हे ललित साहित्याचे भाषेचे खास क्षेत्र होय.

भालचंद्र नेमाडे यांच्या मते, **व्यवहारभाषा** ही जीवनाच्या नानाविध क्षेत्रात उपयोगात आणली जाणारी भाषा आहे. तिचे संदेशवहनाचे कार्य विशाल आहे. व्यावहाभाषा ही साधनरूप असते. **शास्त्रीय भाषा** ही धार्मिक, मानव्य, रसायन, जीव अशा अनेकविध शास्त्रक्षेत्रनिर्दिष्ट पदांनी भरलेली असते. विवेकनिष्ठ अर्थव्यक्तीला शास्त्रीय भाषेत महत्त्व असल्याने सुस्पष्टता हे तिचे प्रमुख लक्षण बनते. शास्त्रीय भाषेत अनेकार्थास भाव मिळत नाही. गणिती अचूकपणा हा तिचा खास विशेष होय. **साहित्यभाषा** ही व्याकरणापलीकडचे अर्थाधिक्य व्यक्त करते. साहित्याच्या भाषेत अर्थव्यक्तीची समृद्धी असते. अनेकार्थत्व हा या भाषेचा खास विशेष असतो. सौंदर्यानुभव देणे हे ललित साहित्याच्या भाषेचे विशेष होय.

शब्दार्थाचा वक्रव्यापार

साहित्याच्या अभ्यासकांनी शब्दांच्या तीन शक्ती मानल्या आहेत. त्या म्हणजे अभिधा, लक्षणा आणि व्यंजना या होत. शब्द एकच असतो. त्याचा मूळ अर्थ एकच असतो पण भिन्न भिन्न परिस्थितीमध्ये त्याला भिन्न भिन्न अर्थ प्राप्त होतो. जशी एकच व्यक्ती, पण ती घरामध्ये वेगळी वागते, नोकरीच्या ठिकाणी वेगळी वागते, सार्वजनिक सभासंमेलनात वेगळी वागते आणि मित्रमैत्रिणींच्या संगतीत वेगळी वागते आणि असा वेगळेपणा असूनही ती व्यक्ती वेगवेगळी नसते तर एकच असते. तसे शब्द एकच असतो पण त्याचा परिसर, सभोवतालचा संदर्भ बदलला की तो वेगळा अर्थ सांगू लागतो. जर एखाद्या गाढवाला उद्देशून

आपण 'तो गाढव आहे' असे म्हटले तर तो वाच्यार्थ झाला. पण जर एखाद्या माणसाला उद्देशून आपण हेच वाक्य म्हटले तर त्याचा अर्थ बदलला. लगेच 'गाढव' या शब्दाचा अर्थ 'मुर्ख मनुष्य' असा होतो. हा दुसरा अर्थ म्हणजे लक्ष्यार्थ होय. हा एकच शब्द आणखीही अर्थ व्यक्त करू शकतो. जर एखाद्या आईने हवेत हातपाय उडवित खेळणाऱ्या आपल्या लहानग्याला उद्देशून हे वाक्य म्हटले तर त्याचा आणखी एक वेगळाच भावार्थ आपल्या लक्षात येतो. तिच्या मनातील वात्सल्यभाव त्या शब्दामधून व्यक्त होतो. या उदाहरणात 'गाढव' या शब्दाला वाच्यार्थ अपेक्षित नाही, 'मुर्ख मनुष्य' यासारखा लक्ष्यार्थही अपेक्षित नाही. तर मुलाबद्दलची कौतुकाची भावना प्रकट करणे एवढाच त्याचा अर्थ घ्यावा लागतो. हा तिसरा अर्थ म्हणजे व्यंग्यार्थ होय.

शब्द म्हणजे पदार्थाचे प्रतीक. 'वृक्ष' हा शब्द 'वृक्ष' या पदार्थाचे प्रतीक आहे. हा शब्द उच्चारताच विशिष्ट आकृतीची वस्तू आपल्या डोळ्यांसमोर येते. शब्दांच्या ठिकाणी ही जी शक्ती आहे तिला अभिधा असे म्हणतात, आणि या शक्तीमुळे जो अर्थ प्रतीत होतो त्यास वाच्यार्थ असे म्हटले जाते. परंतु कित्येकवेळा वाक्याचा अर्थ समजून घेण्याकरिता वाच्यार्थ अपुरा पडतो किंवा कित्येकवेळा वाच्यार्थ उपयोगाचा ठरत नाही अशावेळी अर्थ प्राप्त करून घेण्यासाठी शब्दाच्या वेगळ्या शक्तीचा आश्रय घ्यावा लागतो उदा. 'तू शुद्ध राक्षस आहेस' असे एखाद्याला उद्देशून म्हटल्यास इथे वाच्यार्थ उपयोगी ठरत नाही 'राक्षस' या शब्दाचा अर्थ 'क्रूर कर्म करणारा' किंवा 'क्रूर वृत्तीने वागणारा' असा अर्थ घ्यावा लागतो वा हाच अर्थ इथे अभिप्रेत असतो. शब्दांमधून असा अर्थ सूचविण्याची जी शब्दशक्ती आहे तिला लक्षणा असे म्हणतात आणि या शक्तीने सूचविलेला अर्थ म्हणजे लक्ष्यार्थ होय. पण कित्येकवेळा एवढ्यानेही भागत नाही. उदा. 'कामगार आहे मी, तळपती तलवार आहे' या ओळीत शब्दाचा उच्चार करताच व्याच्यार्थ तर निर्माण होतोच पण त्याहीपेक्षा भिन्न अशा व्यापक अर्थाची सूचना मिळत असते. या सूचित अर्थाला काव्यात फार महत्त्व असते. शब्दाची ही जी शक्ती आहे तिला व्यंजना असे म्हटले जाते आणि तिच्याद्वारे सूचित होणारा जो अर्थ असतो त्यास व्यंग्यार्थ असे म्हटले जाते.

अभिधा

शब्दाची पहिली व मुख्य शक्ती म्हणजे अभिधा होय. एखादा शब्द उच्चारताच आपल्याला तत्काळ एक विशिष्ट अर्थ कळतो. उदा. वृक्ष, वायू, सूर्य, चंद्र, संध्याकाळ ईत्यादी शब्द उच्चारल्याबरोबर त्याचा अर्थ आपणास कळतो. या अर्थाला मुख्यार्थ किंवा वाच्यार्थ असे म्हणतात. यालाच संकेतार्थ असेही म्हणतात. **'वृक्ष' हा शब्द उच्चारताच विशिष्ट वस्तू आपल्या मनासमोर उभी राहते आणि तो शब्द उच्चारणाऱ्याचा आशय आपणाला कळतो. 'सिंह' म्हटल्याबरोबर विशिष्ट आकाराचा हिंस्र पशू जाणवतो. असे आणखी असंख्य शब्द लक्षात घेतल्यास विशिष्ट संकेत डोळ्यासमोर निर्माण होतात व आपल्याला अर्थप्रतीती होते. ही अर्थप्रतीती होण्याची जी पहिली शक्ती आहे तिला अभिधा असे म्हणतात. तिच्यामुळे प्राप्त होतो तो 'वाच्यार्थ' होय.**

अभिधेचे प्रकार :—

संकेताने शब्दांना प्राप्त होणारी ही अभिधाशक्ती तीन प्रकारची आहे. **१. योग २. रूढी ३. योगरूढ**

१. योग :—योग म्हणजे व्युत्पत्ती. व्युत्पत्तीने जेव्हा शब्दांचा अर्थ सिद्ध होतो तेव्हा त्या शब्दशक्तीला योगशक्ती असे म्हणतात. आणि त्या शब्दांना यौगिक म्हणतात. हे शब्द घटकावयवापासून बनलेले असतात. व्युत्पत्तीने हे घटकावयव वेगळे काढल्यास त्यांच्या एकत्र अर्थानेच शब्दाचा अर्थ तयार होत असल्याचे दिसून येते. उदा. गांगेय (गंगा हा मूळ शब्द. गंगेचे अपत्य तो गांगेय) भारतीय (भरत—भारत ही

व्युत्पत्ती किंवा मूळ शब्द)या शब्दांतील प्रकृती आणि प्रत्यय यांच्या एकत्र अर्थाने शब्दाचा अर्थ निष्पन्न होतो. यांना यौगिक शब्द ही संज्ञा आहे.

२. रूढी :—शब्दांची ही शक्ती रूढीने प्रस्थापित झालेली असते. इथे शब्दाचे घटकावयव पाडून म्हणजे व्युत्पत्तीने अर्थ सिद्ध करता येत नाही. या शब्दातील वर्ण्यसमूहाला रूढीनेच अर्थ प्राप्त झालेला असतो. जिथे शब्दार्थ हे रूढीने किंवा संकेताने प्रस्थापित झालेले असतात ते रूढ शब्द होत. उदा. झाड, वेल, वाघ, सिंह, अश्व, मंडप इत्यादी.

३. योगरूढ :—काही शब्दांत अवयव असतात. परंतु त्यांचा अर्थ व्युत्पत्ती प्रमाणे न होता रूढीने निश्चित केलेला असतो. घटकावयवाच्या स्वतंत्र अर्थाप्रमाणे त्यांचा अर्थ लक्षात घेता येत नाही. योगरूढ शब्दांतध्ये योग आणि रूढ या दोन्हीचे मिश्रण येते. म्हणजे त्यात व्युत्पत्तीही लक्षात घेतली जाते आणि सांकेतिकताही लक्षात घेतली जाते. उदा. पंकज हा शब्द 'पंक+ज' म्हणजे चिखलात जन्मलेले. हा यौगिक अर्थ लक्षात घेतल्यास चिखलात जन्मणारा कोणताही विशेष लक्षात घ्यावा लागेल. म्हणजे वेली, बेडूक, गांडूळ किंवा इतर जीवाणू यांनाही पंकज म्हणावे लागेल; पण 'पंकज' म्हणजे 'कमळ'असा अर्थ रूढीने निश्चित केला आहे; आणि कमळही चिखलात जन्मत असते. तेव्हा 'पंकज' म्हणजे 'कमळ' यात योग आणि रूढ या दोन्ही शक्ती कार्यरत आहेत.'खग' हा आणखी असाच योगरूढ शब्द होय. ख+ग म्हणजे आकाशात गमन करणारा असा यौगिक अर्थ; पण विमान, चंद्र, सूर्य असा त्याचा अर्थ न घेता 'पक्षी' हा एकच अर्थ रूढीने निश्चित केला आहे आणि तोच सर्वांकडून स्वीकारला गेला. अशा शब्दांना योगरूढ अशी संज्ञा आहे.

लक्षणा

शब्दाची दुसरी शक्ती म्हणजे लक्षणा होय. एखाद्या वाक्याचा बोध होण्यासाठी कित्येकवेळा मुख्यार्थाचा किंवा वाच्यार्थाचा बोध होत नाही. अशा वेळी मुख्यार्थ सोडून जो अर्थ आपण स्वीकारतो त्यास लक्ष्यार्थ असे म्हणतात. 'घरावरून हत्ती गेला' या वाक्यात घरावरून शब्दाचा मुख्यार्थ घेतल्यास अर्थ लागत नाही. मुख्यार्थाला येथे बाध येतो. म्हणूनच लक्ष्यार्थाकडे जावे लागते. 'घरावरून' म्हणजे 'घरासमोरून' हा लक्ष्यार्थ होय. मुख्यार्थ सोडून आपण वेगळ्या अर्थाकडे जातो खरे; पण हा वेगळा अर्थ कोणत्यातरी परीने मुख्यार्थाशी संबंधित असला पाहिजे. 'मी शेक्सपीयर वाचला' या वाक्यातील शेक्सपीयर म्हणजे त्याची नाटके. या दोन अर्थाचा संबंध आहे. 'तू शुद्ध राक्षस आहेस' या वाक्यातील राक्षस हा शब्द प्रत्यक्ष राक्षस नसलेल्या माणसासंबंधी योजिला आहे. याचे कारण दोघांची कृती सारखी आहे. समीपता, साहचर्य, सादृश्य, कृती इ. संबंधांमुळेच मुख्यार्थाबद्दल लक्ष्यार्थ येऊ शकतो. त्यात मुख्यार्थ कामी पडत नाही. हत्ती घरासमोरून गेला असे न सांगता घरावरून असे म्हणण्याने समिपता दाखवणे हा हेतू होता.

लक्षणेचे प्रकार :—

संस्कृत साहित्य अभ्यासकांनी लक्षणेचे मुख्य दोन प्रकार कल्पिले. **१. गौणी लक्षणा (सादृश्यमूलक) आणि २. शुद्धा लक्षणा (सादृश्येतर).** गौणी लक्षणा हे गुणसादृश्यामुळे होते तर शुद्धा लक्षणा ही सादृश्येतर संबंधावर अवलंबून असते.

गौणी लक्षणेचे दोन प्रकार पडतात. १. सारोपा २. साध्यवसाना

'सारोपा' लक्षणेमध्ये दोन वस्तूंपैकी एकीचा दूसरीवर आरोप केलेला असतो. उदा. 'तिचे मुख म्हणजे चंद्रबिंबच' या मध्ये मुखावर चंद्रबिंबाचा आरोप केला आहे. या वाक्यातील उपमेय काढून टाकून केवळ उपमानाचीच योजना केल्यास **साध्यवसाना** लक्षणा होते. उदा. रमणीमुख पाहून एखाद्याने 'हा चंद्रच

भूतलावर उतरला आहे.' इथे रमणीमुख हे उपमेय कढून टाकून चंद्र या उपमानाचीच फक्त योजना केली गेली. म्हणजे इथे 'मुख' हा शब्द लोप पावला आहे.

सादृश्येतर संबंधावर अधिष्ठित असलेल्या शुद्धा लक्षणेचे चार प्रकार पडतात १. सारोपा २. साध्यवसाना ३. उपादान ४. लक्षणलक्षणा

यापैकी पहिले दोन प्रकार गौणी लक्षणेप्रमाणेच आहेत. फक्त वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ यांचे संबंध येथे साधर्म्यावर अधिष्ठित नसून **कार्यकारणभावावर** अधिष्ठित आहेत. उदा. च्यवनप्राश म्हणजे साक्षात बलच होय. या वाक्यातील संबंध सादृश्यमूलक नाही. च्यवनप्राश बलनिर्मितीचे कारण आहे. ही शुद्धा सारोपा लक्षणा होय. याच वाक्यातील उपमेय काढून टाकल्यास शुद्धा साध्यवसाना लक्षणा होते. उदा. (च्यवनप्राश सेवनाला उद्देशून) तो साक्षात बलसेवनच करीत आहे. येथे च्यवनप्राश शब्द लोप पावला आहे.

उपादान लक्षणेमध्ये शब्दाचा मुख्यार्थ लक्ष्यार्थामध्येच समाविष्ट होतो. मात्र तो पूर्णपणे नाहिसा होत नाही. उदा. 'पानपतवर सव्वा लाख बांगडी फुटली.' यामधील 'बांगडी फुटणे' यातील मुख्यार्थ 'वैधव्य येणे' या लक्ष्यार्थाला प्रगट करीत स्वत: येतोच: तो लक्ष्यार्थात समाविष्ट आहेच. लक्षणलक्षणेमध्ये मुख्यार्थ लक्ष्यार्थाला पुढे करून आपण लुप्त होतो. उदा. 'घरावरून हत्ती गेला.' या वाक्यात घरासमोरून हा लक्ष्यार्थ व्यक्त करून मूळचा वाच्यार्थ वा मुख्यार्थ लोप होतो.

व्यंजना

व्यवहारात किंवा शास्त्रात अभिधा वा लक्षणा या दोन शक्तींचा उपयोग पुरेसा होतो; पण शब्दार्थांच्या वक्रव्यापाराचीच जिथे केवळ आवश्यकता असते अशा काव्य वा ललितसाहित्यनिर्मितीत या दोन्ही शक्ती कमी पडतात. तिथे या दोन्ही शक्तींच्या पलीकडील अर्थवलयांची आवश्यकता असते. हा व्यंग्यार्थ होय. तो व्यंजना या शब्दशक्तीमुळे प्राप्त होतो. काव्यात वा ललित साहित्यात सूचकतेला अधिक महत्त्व असते. साहित्यकृती ही नवनिर्मिती असते. तेव्हा साहित्यकलाकृतीच्या माध्यमातून लेखक वा कवी जे सूचवू पाहतो ते अभिधा व लक्षणा या दोन शक्तींच्या आधारे लक्षात घेणे अशक्य असते. या दोन्ही शक्तींच्या पलीकडील व्यंजना या शब्दशक्तीचा उपयोग तिथे होतो. साहित्यकलाकृतीतून वा काव्यातून प्रकट होणाऱ्या या सूचकतेला आनंदवर्धन या संस्कृत साहित्यमीमांसकांनी ध्वन्यर्थ, सूचितार्थ किंवा व्यंग्यार्थ असे म्हटले आहे.

मुख्यार्थाचा बाध न होता शब्दोच्चाराबरोबर रसिकाच्या अंत:करणात वाच्यार्थाहून भिन्न अशा रमणीय अर्थाची जी अनंत वलये निर्माण होतात त्यांनाच व्यंग्यार्थ अथवा ध्वन्यार्थ हे नाव आहे. अभिधेने शब्दांचा मुख्यार्थ समजतो. लक्षणेने लक्ष्यार्थ समजतो, पण याही पलीकडचा असा काही अर्थ रसिकाला प्रत्यय येतो. हा अर्थ शब्दांच्या संकेताने निष्पन्न झालेला नसतो. तसेच येथे मुख्यार्थाला बाध आलेला नसल्यामुळे तो लक्ष्यार्थही ठरत नसते. तर येथे व्यंजना ही शब्दशक्तीच कार्य करीत असते. उदा. 'गंगायां घोष:' या वाक्यातील गंगायां म्हणजे गंगेमध्ये या मुख्यार्थाचा बाध होऊन 'गंगायां' म्हणजे 'गंगातटावर' असा लक्ष्यार्थ निष्पन्न झाला पण एवढ्यानेच गंगानदीच्या पावित्र्याचा बोध होत नाही. हा बोध होण्यासाठी व्यंजना नावाची स्वतंत्र शक्ती मानावी लागते. अभिधा आणि लक्षणा आपापले कार्य करून निवृत्त झाल्यावर व्यंजना सुरू होते. व्यंजनेच्या अर्थाला व्यंग्यार्थ तसेच ध्वन्यार्थ असे म्हटले जाते.

व्यंजनेचे प्रकार :—

व्यंजनाशक्ती दोन प्रकारची आहे. १. शाब्दी २. आर्थी

शब्दांवर अधिष्ठित अशी व्यंजना ती शाब्दी व्यंजना. अर्थावर अधिष्ठित ती आर्थी व्यंजना.

शाब्दी व्यंजना :—एखाद्या शब्दाला दोन स्वतंत्र वाच्यार्थ असून एक संदर्भाने नियंत्रित झाला आणि दुसरा ध्वनिरूपाने व्यक्त होऊ लागला, अथवा शब्दाच्या वाच्यार्थाला बाध येऊन दुसराच अर्थ लक्षणेने घ्यावा लागला म्हणजे जो ध्वनिव्यापार सिद्ध होतो तो मूळ शब्दावरच आधारित असतो. म्हणून याला शाब्दी व्यंजना असे म्हणतात.

शाब्दी व्यंजनेचे दोन प्रकार पडतात १. अभिधामूलक व्यंजना २. लक्षणामूलक व्यंजना

१. अभिधामूलक व्यंजना :—वाक्यरचनेतील द्व्यर्थी शब्दाचे अर्थ निश्चित करणारी संयोग, वियोग, साहचर्य इ. गमके साहित्यमीमांसकांनी सांगितलेली आहेत. राम—लक्ष्मण आणि रामार्जुन यांमधील पहिल्या राम शब्दाचा अर्थ दशरथी राम असा लक्ष्मणाच्या साहचर्याने निश्चित होतो. आणि दुसऱ्या शब्दातील राम म्हणजे परशुराम असे सहस्रार्जुनाशी त्याचा जो विरोध होतो त्यावरून निश्चित होतो. पण कित्येक वेळा संयोग साहचर्यादींनी मुख्यार्थ निश्चित होऊनही अमुख्य वृत्तीने त्या शब्दाचा दुसरा अर्थही आपल्या मनामुढे येतो. हा दुसरा अर्थ प्रस्तुत नसतो; पण त्या शब्दाची कवीने अशा काही खुबीने योजना केलेली असते की प्रस्तुत मुख्यार्थ निश्चित होऊनही अप्रस्तुत अर्थही अमुख्य व्यापाराने वाचकाच्या मनापुढे येतोच, हीच अभिधामूलक व्यंजना होय. शब्दाचा दुसरा अर्थ व्याच्यार्थच असतो म्हणून ही अभिधामूलक व्यंजना होय. उदा. 'भावंबधन' नाटकात प्रभाकर जेव्हा 'मी आता मुक्याचे व्रत सोडणार नाही' असे म्हणतो तेव्हा मौनव्रत हा अर्थ अभिप्रेत आहे. संदर्भाच्या दृष्टीने तोच योग्य अर्थ आहे. पण या शब्दामधून 'चुंबनव्रत'ही ध्वनित होत असतो. शब्दाचे दोन्ही अर्थ संभवतात. दोनही मुख्यार्थच आहेत पण यावेळी व्यंजनाव्यापाराने सांदर्भिक अर्थ घ्यावा लागतो.

२. लक्षणामूलक व्यंजना :—हा शब्दी व्यंजनेचा दुसरा प्रकार होय. या व्यंजनेत शब्दालाच प्राधान्य असते पण शब्दाचा वाच्यार्थ येथे अनावश्यक असतो. इथे वाच्यार्थापेक्षा लक्ष्यार्थाला महत्त्व द्यावे लागते. इथे लक्ष्यार्थच काव्यमय असतो. उदा. 'तिच्या घरावरून रेल्वे गेली आहे.' हे लक्षणेचे वाक्य लक्षात घेतल्यास 'घरावरून' रेल्वे जाणे शक्य नाही. म्हणून आपण त्याच लक्ष्यार्थ घराच्या जवळून, 'जवळच्या रस्त्यावरून' असा घेतो. मग 'रस्त्यावरून' असा शब्दप्रयोग का केला गेला नाही? 'घरावरून' असा शब्दप्रयोग का केला गेला तर तो रेल्वेमार्ग व तिचे घर यांचे निकटत्व त्यामधून सूचित करायचे असते. हे निकटत्व सुचविणे हे लक्षणेचे प्रयोजन आहे पण हे लक्षणेचे प्रयोजन लक्षणेने कळत नाही. ते कळते व्यंजनेने. प्रयोजनवती लक्षणेमागे अशा प्रकाराने व्यंजनाव्यापार अभिप्रेत असतो.

<u>आर्थी व्यंजनेचे तीन प्रकार पडतात १. वस्तुध्वनी २. अलंकारध्वनी ३. रसध्वनी</u>

१. वस्तुध्वनी :—वाच्यार्थातून व्यक्त होणारा व्यंग्यार्थ जेव्हा एखाद्या वस्तूचा किंवा कल्पनेचा आविष्कार करीत असतो तेव्हा वस्तुध्वनी होतो. उदा. 'सूर्य अस्ताला गेला' या वाक्यामधून ते वाक्य उच्चारणाऱ्या विशिष्ट व्यक्तीला अनुसरून वाचकाला जे वेगवेगळे अर्थ जाणवतात ते केवळ वस्तुरूप असतात म्हणून वस्तुध्वनी संभवते. 'सूर्य अस्ताला गेला' या वाक्यात हे वाक्य प्रेयसीने उच्चारले असेल, तर प्रियकराला भेटण्याची वेळ झाली हा अर्थ त्यामधून व्यक्त होतो. आईवडिलांनी संध्याकाळी फिरायला नेण्याचे आश्वासन दिलेल्या एखाद्या लहान मुलाने हे वाक्य उच्चारले असेल, तर आता फिरायला जाण्याची वेळ झाली, हा त्याच्या मनातील आनंद त्यातून व्यक्त हाईल. ऑफिसमध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रीने उच्चारले

असेल तर, तिच्या मनातील घराची ओढ त्या वाक्यातून व्यक्त होईल. अशाप्रकारे एका वाक्यातून अनेक अर्थ सूचित होतात.व्यंग्यार्थाने जाणवणारा भावार्थ साध्या वाच्यार्थाने सांगता येत असेल तेव्हा तेथे वस्तुध्वनी संभवते. आणखी एक उदाहरण पाहता येते, 'कुणी मारावे, कुणी मरावे। कुणी जगावे खाउनि दगड। वितळवुनि कुणी आयुष्याला। ओतावे अन् सोन्याचे धड।।' या मर्ढेकरांच्या कवितेमधील कडव्याचा अर्थ वाच्यार्थाने सांगता येणे शक्य आहे. काही व्यक्तीच्या नशिबी फक्त दुसऱ्यांसाठीकष्ट उपसणे एवढाच भोग असतो. अशा प्रकारच्या वाच्यार्थातून तो सांगता येतो. खरे तर 'दगड खाऊन जगणे किंवा आयुष्य वितळवून सोन्याचे घड ओतणे' या ठिकाणी लक्ष्यार्थ घ्यावा लागतो. पण कडव्यामधून सूचित होणारा अर्थ वाच्य होऊ शकतो. 'ज्या व्यक्तीच्या नशिबी दुसऱ्यांसाठी कष्ट सोसणेच आहे. त्या कष्टाचा उपभोग दुसरेच घेतात.' या प्रकाराने तो अर्थ वाच्य होऊ शकतो म्हणून तेथे वस्तुध्वनी संभवते.

२. अलंकारध्वनी :—व्यंगार्थ जेव्हा एखाद्या अलंकाराच्या रूपाने व्यक्त होतो तेव्हा अलंकार ध्वनी होतो. अर्थात यातील अलंकार स्पष्ट नसून सूचित असतात. उदा. तरुणीच्या रूपाकडे पाहून एखादा तरुण म्हणतो, 'राहूकडून त्रास होण्याची भीती नाही; कलंकाचा संबंध नाही, फिकटपणा नाही; हे सुंदरी तुझ्या मुखाची शोभा नित्य आणि सर्वत्र वाढतच चालली आहे.' येथे उपमान जो चंद्र त्याचा उल्लेख नाही. पण राहू आणि कलंक इ. नी चंद्राची सूचना मिळते.उपमेयाचे श्रेष्ठत्व वर्णिले असल्याने व्यतिरेक ध्वनी होते. यातून व्यतिरेक अलंकार सूचित होतो. कुसुमाग्रजांच्या 'समिध्याच सख्या' या कवितेचे उदाहरण पाहता येते, 'समिधाच सख्या या, त्यांत कसा ओलावा। कोठून फुलांपरि वा मकरंद मिळावा। जात्याच रूक्ष त्या, एकच त्या आकांक्षा। तव अंतरअग्नी क्षणभर तरि फुलवावा ।।' या काव्यपंक्तीत समिधा— पद्यपंक्ती, ओलावा—गोडवा, मकरंद—रसवत्ता इत्यादी अर्थ हा अंतरअग्नी या शब्दप्रयोगाने सूचित होतो. अंतरअग्नी हे रूपक आहे आणि पहिल्या तीन ओळींमध्ये मात्र उपमेयाचा निर्देशही केलेला नाही, म्हणून हे अतिशयोक्तीवर आधारलेले अलंकारध्वनीचे उदाहरण ठरते.

३. रसध्वनी :—वस्तुध्वनी आणि अलंकारध्वनी हे दोन्ही प्रकार लौकिक आहेत. कारण त्यातील भावार्थ शब्दांनी वाच्य होऊ शकतो. उलट रसध्वनी हा शब्दाने वाच्य होत नाही.त्याचे आकलन होण्यास रसिकाजवळ प्रतिभा असायला पाहिजे.रसध्वनीस काव्याचा प्राण मानले गेले. रस म्हणजे आजच्या भाषेत काव्याचे वा ललित साहित्याचे लालित्य, सौंदर्य, कलागुण होय. काव्यात रसध्वनीला विशेष महत्त्व आहे. उदा. पार्वतीला मागणी घालण्यासाठी शंकराकडून ऋषी हिमालयाकडे आले असता पार्वती पित्याशेजारी उभी होती. ऋषीने पार्वतीस शंकराकरिता मागणी घातली असता पित्याच्या बाजूला उभी असणाऱ्या पार्वतीने आपल्या हातातील कमळाच्या पाकळ्या मोजायला सुरुवात केली.पार्वती कमळाच्या पाकळ्या मोजू लागली या वाक्याचा अर्थ वाच्यार्थाने लक्षात घेणे अशक्य आहे. वाच्यार्थाने पार्वतीच्या अंत:करणातील मर्म कदापि लक्षात येत नाही. पार्वतीच्या अंत:करणात उद्‌भवलेल्या लज्जा, आनंद इत्यादी भावना या केवळ अनुभूतीगम्य आहेत. याचा प्रत्यय व्यंग्यार्थाशिवाय घेता येत नाही. यालाच व्यंग्यार्थ वा ध्वन्यार्थ असे म्हटले जाते. ध्वन्यार्थाच्या अनुषंगाने प्रतीत होणाऱ्या या रसभावनेस रसध्वनी असे म्हटले गेले. झपूर्झा (केशवसुत), पिपात मेले ओल्या उंदिर (मर्ढेकर), औदुंबर (बालकवी) अशा विविध कवींच्या कवितांमधून ध्वन्यर्थ प्रकट होत असते. खरेतर श्रेष्ठ दर्जाचे काव्यसौंदर्य व्यंजनासामर्थ्यामुळे आस्वादू शकतो.

प्रतीक, प्राक्कथा, प्रतिमा, रूपक

- **प्रतीक:** काव्यनिर्मितीत प्रतीकाचे विशेष महत्त्व असते. प्रतीक म्हणजे चिन्ह. चिन्ह हे नेहमी सूचकतेच्या स्वरूपात असते. काव्यात प्रतीकाला फार महत्त्व आहे. प्रतीकाचा संबंध सूचकतेशी असतो. प्रतीकाची निर्मिती लेखक–कवीच्या कल्पनाशक्तीतून होत असते. प्रतीके आणि त्यातील सूचित अनुभव त्याच्यात तार्किक अर्थ दडलेला असतो. प्रतीक योजना जितकी चांगली तितके काव्य सुंदर होत असते.
- **प्राक्कथा:** आदिबंधात्मक समीक्षापद्धतीतून प्रक्कथेचा विचार साहित्यात होऊ लागला. प्रा. गंगाधर पाटील आणि प्रा. म. सु. पाटील यांनी आदिबंधात्मक समीक्षापद्धतीत साहित्यनिर्मितीत प्राक्कथांचा विचार केला आहे. प्रत्येक समाजाला एक खास संस्कृती असते आणि तिला स्वत:ची एक खास परंपरा असते. या परंपरेतून काही स्मृतिरूप अवशेष सर्व समाजाच्या मनाच्या नेणिवेच्या स्तरावर रेंगाळत असतात. त्यात आनुवंशिकतेच्या खुणा दिसू लागतात. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अनुभवाचा साठा चालत आलेला असतो. साहित्यात आदिम प्रतिमा दिसू लागतात. त्याप्रमाणे प्राक्कथा दिसून येतात. पुरातन ग्रंथांतून प्राक्कथांची निर्मिती झालेली असते. सीता, मारुती, शकुंतला, द्रोणाचार्य यांच्या जन्मकथा या परंपरेने मानवसमूहाच्या मनातील नेणिवेच्या स्तरावर जपलेल्या स्मृतींची प्राक्कथारूपेच होत. युगानुयुगे मानव जे जीवन जगता आला त्याचे स्तर म्हणजे सामूहिक नेणिवेकडून पुरविले जाणारे अनुभवविश्व हे प्राक्कथाचे स्वरूप होय.
- **प्रतिमा:** कवीच्या अनुभूतीतून प्रकटलेला सहज, स्वभाविक व नैसर्गिक आकार किंवा लाभलेले गोचर रूप (दृश्य रूप) म्हणजे प्रतिमा होय. प्रतिमा हे कवीच्या अनुभूतीला लाभलेले गोचर ऐंद्रिय रूप आहे. चैतन्य, सजीवत्व किंवा सेंद्रियत्व हे प्रतिमेचे विशेष होत. सुधीर रसाळ यांनी कल्पनाशक्तीच्या मुक्त विहारामुळे कवीला काव्यात्म प्रचिती येते आणि ही प्रचिती म्हणजेच प्रतिमा होय असे म्हटले आहे. एफ. सी. प्रिस्कॉट प्रतिमा घडविणारी शक्ती म्हणजे कल्पनाशक्ती होय असे म्हणतात. तर कोलरीजच्या मते प्रतिमेची निर्मिती हे कल्पनाशक्तीचे मूलभूत कार्य होय.
- **रूपक:** रूपक हा अलंकाराचाच एक प्रकार आहे. यात उपमेय आणि उपमान यातील अभेद कल्पिला जातो. उपमेय व उपमान यांत एकरूपता आहे. ती भिन्न नाहीत असे वर्णन जेथे असते तेथे रूपक हा अलंकार असतो. कल्पनाशक्तीच्या पातळीवर जवळजवळ दोन वस्तू सारख्याच असल्याची कल्पना केली जाते. उदा. मुखचंद्र यात मुख हे उपमेय आणि चंद्र हे उपमान ही दोन्ही एकरूप मानून मुखचंद्र असा शब्दप्रयोग केला गेला.

शैलीविचार

शैली ही संज्ञा आविष्कारपद्धतीशी/अभिव्यक्तीशी समानार्थक मानली जाते. त्यामुळे रीत, पद्धत, लकब, धाटणी, तंत्र म्हणजे शैली असा अर्थ शैलीचा प्रचलित आहे. भारतीय साहित्यशास्त्रात शैलीची संकल्पना वामन यांनी मांडली आहे. 'रीती हा काव्याचा आत्मा आहे. विशिष्ट स्वरूपाची पदांची रचना म्हणजे रीती' असे त्यांनी म्हटले आहे. आधुनिक मराठी साहित्यात साहित्यकृतीचे रसग्रहण करताना त्यात काय सांगितले आहे आणि कसे सांगितले आहे या दोन्ही दृष्टीने अनेकदा विचार करण्यात आला. त्यातून साहित्यकृतीतील आशय आणि अभिव्यक्ती असा विचार पुढे होऊ लागला.

शैलीच्या संदर्भात विविध अभ्यासकांच्या व्याख्या खालीलप्रमाणे :

ब्युफॉ यांच्या मते, 'शैली म्हणजे ,खुद्द लेखकच' म्हणजेच त्यांनी शैलीविचारात लेखकाच्या व्यक्तित्वाचा आविष्कार समाविष्ट केला.

गुस्तॉव फ्लोबे यांच्या मते, 'शैली म्हणजे लेखकाची विचार करण्याची व अवलोकन करण्याची खास पद्धत' होय

लॉजिनस यांच्या मते, 'उदात्त वा थोर व्यक्तिमत्त्वाचा पडसाद म्हणजे शैलीची उच्चतरता' होय.

गिबन यांच्या मते, 'शैली म्हणजे व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब' होय.

- **लेखक तशी शैली :**

प्रत्येक लेखक एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असतो. त्याची स्वत:ची स्वतंत्र शैली असते. त्यामुळे अनुभवाची निवड, स्वीकार, भावसत्याचा आविष्कार साहित्यनिर्मितीच्या दृष्टीने होणाऱ्या क्रीया स्वतंत्र होत असतात. अर्थात लेखनाद्वारे लेखक स्वत:च प्रकट होत असतो आणि लेखनाच्या द्वारा त्याचा आत्माविष्काराचे प्रतिबिंब पडत असल्याने लेखानावर त्यांच्या स्वतंत्र शैलीचा प्रभाव पडणे स्वाभाविकच आहे त्यामुळेच लेखक तशी शैली हा विचार साहित्यात केला जातो.

एखादा नेमका विषय घेऊन लेखकांनी निर्माण केलेल्या लेखनकृती वेगवेगळ्या झाल्याच्या दिसतात. उदा. मराठीत अर्जुन–शुभद्रा यांच्या विवाहाचे केंद्र करून अण्णासाहेब किर्लोस्कारांनी 'सौभद्र' आणि काकासाहेब खाडीलकरांनी 'त्रिदंडी सन्यास' अशी दोन संगीत नाटके लिहिली. ही दोन्ही नाटके स्वतंत्र शैलीची आहेत. कारण दोन्ही नाटकाचा विषय एकच असला तरी लेख्का हे भिन्न आहेत. अर्थात विषय एकच असला तरी लेखक वेगळे असल्यामुळे आशय बदलतो, अभिव्यक्ती बदलते परिणामी शैलीही बदलत असते.

- **आशय तशी शैली**

जसा आशय तशी शैली या सूत्रानुसार आशयाचे महत्त्व आपोआपच लेखनाच्या अभिव्यक्तीला लाभत असते. यामुळेच प्रत्येक ठिकाणी स्वतंत्र शैली संभवत असते. लेखकाच्या भिन्न लेखनकृतीमध्ये भिन्न शैलीचे दर्शन घडते. तसेच एखाद्या लेखकाच्या एकाच लेखनकृतीमध्ये भिन्न शैलीचेही दर्शन घडू शकते कारण त्या त्या ठिकाणच्या अशयाच्या स्वरूपावर ते अवलंबून असते. उदा. राम गणेश गडकरी यांच्या 'एकच प्याला' या नाटकात सुधाकर, सिंधू, रामलाल यांच्या संवादशैलीचे स्वरूप आणि तळीराम आदी आर्य मदिरा मंडळाच्या सभासदाच्या संवादशैलीचे स्वरूप अगदी भिन्न अशा स्वरूपाचे आहे. एकूणच आशयातील बदलामुळे जसे साहित्यकलाकृतीचे रूप बदलते, तशी शैलीही बदलते.

- **साहित्यप्रकार तशी शैली :**

शैलीच्या बाबतीत कलावंताचे मन आणि त्याचा कलाव्यापार हा केंद्रस्थानी असल्यामुळे साहित्यप्रकार व शैली यांच्यातील संबंध एका मर्यादेपर्यंतच मानावा लागतो. निर्मितीच्या प्रक्रियेत साहित्यप्रकाराला कितपत स्थान असते हा एक वादाचा मुद्दा असू शकतो असे वा. ल. कुलकर्णी यांना वाटते. सौंदर्यशास्त्रज्ञ क्रोचे यांनी साहित्यप्रकाराची संकल्पना नाकारली आहे. काव्यात्म, नाट्यात्म आणि वर्णनात्म अशा साहित्याच्या बाबतीत आविष्काराच्या तीन शैलींचा खूप जुन्या काळापासून निर्देश करण्यात येतो. काव्य, नाटक, कथा आणि कादंबरी यांचा शैलीशी संबंध जोडला गेला आहे पण या साहित्यप्रकारांत शैलीच्या संदर्भात परस्पर अशी व्याप्ती असते. उदा. नाटककार शिरवाडकर यांची संवादशैली काव्यात्म आहे. आणि त्यांची काव्यशैलीत नाट्यात्मकताही दिसून येते. तेव्हा हे शैलीदृष्ट्या साहित्यप्रकाराचे सीमाबंद

असे कप्पे तयातर करता येणे अशक्य ठरते. मराठी साहित्यात कादंबऱ्यांचे नाटकांत रूपांतर झाले आहेच. श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर यांनी आपल्याच कादंबऱ्यांचे रूपांतर नाटकात केले आहे. तेव्हा शैलीत बदल झाल्याचे दिसून येते. जयवंत दळवींच्या 'महानंदा' या कादंबरीचे शं. ना. नवरे यांनी 'गुंतता हृदय हे' हे नाट्यरूपांतर केले तेव्हा शैलीत बदल झाल्याचे दिसून येते. अर्थात साहित्यप्रकार एका मर्यादेपर्यंत शैली नियत करीत असतात.

बोलीभाषेचा उपयोग

ललित साहित्याच्या बाबतीत बोलीभाषेचा उपयोग महत्त्वाची बाब ठरत असते. ग्रांथिक वळणाची भाषा शास्त्राच्या दृष्टीने योग्य भाषा असते. तिचे स्वरूप व्याकरण आणि भाषाशास्त्र यांच्या नियमांनी बद्ध असते. ती तात्त्विक स्वरूपाची भाषा असते. बाली भाषेचा रोजच्या जीवनव्यवहारात सातत्याने उपयोग होत असल्यामुळे बोलीभाषेत जीवनसापेक्ष लवचिकपणा आणि जिवंतपणा असतो. नानाविध भावनांचे आरोह अवरोह आणि बोलणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष व्यक्त करणे बोलीभाषेला सहज जमत असते. बोलीभाषेत भावनात्मक परिणामक्षता असते.

ललितसाहित्याच्या दृष्टीने आवश्यक अशी गुणवैशिष्ट्य फक्त बोलीभाषेतच दिसून येतात. शैलीची विविधता ग्रांथिक भाषेत जाणवत नाही ती बोलीभाषेतच अधिक जाणवत असते. जीवनाचे दर्शन घडवू पाहणाऱ्या ललित साहित्यात प्रत्यक्ष जीवनाशी संबंधित असेच भाषेचे स्वरूप असले पाहिजे. ही भाषा म्हणजेच बोलीभाषा होय. मराठी साहित्यात बोलीभाषेचा उपयोग प्रामुख्याने प्रादेशिक लेखक करू लागले. मराठीत अनेक बोली आहेत आणि या बोलीतून लिहिले गेलेले साहित्य पुढे येऊ लागले. बहिणाबाई चौधरी यांच्या अहिराणी काव्यरचनेने रसिकांना मुग्ध करून सोडले. उद्धव शेळके, रा. रं. बोराडे, व्यंकटेश माडगुळकर, आनंद यादव, राजन गवस अशी या संदर्भात नावे घेता येण्यासारखी आहेत. प्र. इ. सोनकांबळे, दया पवार, लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, रुस्तम अचलखांब अशा एक ना अनेक लेखकांनी त्यांचे लेखन बोली भाषेतून केले आहे. त्यांचे लेखन बोलीच्या दृष्टीने अभ्यासनीय ठरले आहे. तसेच मराठी साहित्यरसिकांना त्यांच्या लेखनाने वेगळा अनुभवही दिला आहे.

भाषा हे ललित साहित्याचे साधन की माध्यम?

भाषा हे ललित साहित्याचे साधन की माध्यम हा एक बहुचर्चित प्रश्न आहे. भाषा ही नुसती भाषा नसते तर ते भाषेचे एक सौंदर्य संस्करित रूप असते. अमूर्त असा काव्यानुभव कवी वाचकांच्या मनात भाषेच्या आधारे संक्रांत करीत असतो म्हणून भाषेला साधन न म्हणता माध्यम म्हटले गेले. तो अनुभव नुसता समजावून देण्याचे काम भाषेने केले तर भाषा उघडउघड साधन होईल. भाषेच्या अशा रूपाला ललितसाहित्याच्या व्यवहारात फारसे असे स्थान नसते. उदा. 'पिपात मेले ओल्या उंदिर' ही मर्ढेकरांची कविता समकालीन वास्तवाच्या उलथापलथीचा अनुभव प्रकट करते. तो अनुभव 'ओल्या पिपात उंदिर मेले' अशी वाक्यरचनेचा नियम सांभाळून सिद्ध होणारी ओळ देणार नाही. म्हणूनच ललित साहित्यात विशेषत: काव्यात भाषा ही भाषा म्हणून अवतरत नाही तर प्रतिमारूपात ती प्रकट होत असते. ती माध्यमस्वरूपाचीच असते.

भाषा ललित साहित्याचे साधन की माध्यम या संदर्भात भालचंद्र नेमाडे आपली भूमिका व्यक्त करताना भाषेच्या अर्थवहनाचे कार्य लक्षात घेतात. ते म्हणतात, 'व्याकरणाचे नियम सांभाळित हे कार्य जोवर भाषा करते तोवर ती साधन असते आणि जेव्हा ते कार्य करून भाषा आणखी काही अर्थ प्रकट करू लागते तेव्हा ती माध्यम बनते. त्यांच्या मते भाषा ही साहित्यप्रकारानुसार कधी साधन तर कधी माध्यम म्हणून

वावरत असते. भावकवितेत ती माध्यम म्हणून वावरते तर निबंधात साधन म्हणून वावरते, नाटकात ती प्राय: साधन असते तर कादंबरीत या दोन्ही भूमिका तीव ठवीत असते. तेथील वर्णनात्मक आणि निवेदनात्मक भागात भाषेच स्वरूप साधनाचेच असते.' यावरून असे स्पष्ट करता येते की **भाषा हे साहित्याचे साधनच आहे मात्र भाषेने प्रतिभेचे व कल्पनाशक्तीचे रूप धारण केले किंवा ती प्रतिमारूपात आली की ती साहित्याचे माध्यम होते.**

- संभाव्य प्रश्न

✓ व्यंजना शब्दशक्तीचे स्वरूप स्पष्ट करा.
✓ लेखक तशी शैली हा मुद्दा स्पष्ट करून सांगा.
✓ व्यवहारभाषा आणि साहित्यभाषा यातील फरक सांगा.
✓ अभिधा शब्दशक्तीचे स्वरूप स्पष्ट करा.
✓ अभिधा शब्दशक्तीचा अर्थ स्पष्ट करा.
✓ बोलीभाषेचा उपयोग यावर टिपण लिहा.
✓ आशय तशी शैली/ लेखक तशी शैली/ साहित्यप्रकार तशी शैली या मुद्द्यांचा परामर्श घ्या.
✓ शैली म्हणजे काय?/ शैलीच्या विविध व्याख्या स्पष्ट करा.
✓ लक्षणा शब्दशक्तीचे स्वरूप स्पष्ट करा.
✓ प्रतिमा आणि प्रतीक म्हणजे काय?
✓ प्राक्कथा म्हणजे काय?
✓ रूपक म्हणजे काय?
✓ भाषा हे ललित साहित्याचे साधन की माध्यम? चर्चा करा